पुढारी

# वाईत मराठी विश्वकोषच्या मोबाईल ॲपचे लोकार्पण

**वाई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या मोबाईल ॲपचा लोकार्पण सोहळा महागणपती घाटावरील काशी विश्वेश्वर मंदिराच्या प्रांगणात दि. १२ रोजी अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी बुकगंगा डॉटकॉमचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, सचिव सुवर्णा पवार, उपसचिव जगतानंद भटकर आदी उपस्थित होते. यावेळी मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त चार दिवसीय ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटनही करण्यात आले.

याप्रसंगी दिलीप करंबेळकर म्हणाले, तंत्रज्ञानाने जगभरात नवी क्रांती केली आहे. या ज्ञानाच्या क्रांतीत सहभागी होत मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने मोबाईल ॲपद्वारे मराठी साहित्यसंपदा जगभरात पोहोचविण्याचा निर्णय घेतला आहे. हे ॲप तयार करण्यासाठी बुकगंगा डॉटकॉमचे मंदार जोगळेकर यांनी म ोलाचे सहकार्य केले. मराठी विश्वकोश ऑनलाईन वाचता यावा, ज्ञानमंडळांद्वारे ज्ञानाचे विकेंद्रीकरण व्हावे, ऑडिओ आणि व्हिडिओ तंत्राचा वापर करून हे ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी मंडळाने पुढाकार घेतल्याचे त्यांनी सांगितले.

मंदार जोगळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुवर्णा पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन सरोजकुम ार मिठारी यांनी केले. जगतानंद भटकर यांनी आभार मानले. मंडळाचे सदस्य माधव चौंडे, सु. र. देशपांडे, डॉ. शरद अभ्यंकर, सतीश कुलकर्णी, प्रा. सदाशिव फडणीस, लक्ष्मीकांत रांजणे, वसंतराव बोपर्डीकर, अरुण आदलिंगे, शिवाजी राऊत उपस्थित होते.